# स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ



## महा शिबीर

३० एप्रिल २०२३



५०

सुवर्णमहोत्सवी वर्ष

**लक्षात ठेवा पुरते पक्के, मराठी माणूस शंभर टक्के !**

स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ

# आवाहन

समाज प्रबोधन, रोजगार प्रशिक्षण, कल्पक नेतृत्व, सकारात्मक विचारसरणी, शिस्त, सजग समाजभान म्हणजेच "स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ".

५० वर्षांपूर्वी स्थानिक भूमिपुत्रांची शैक्षणिक गरज लक्षात घेऊन शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांनी स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ नावाचं एक रोपटं लावलं. सकस जमीन आणि प्रामाणिक मशागतीमुळे बीज रुजलं, बहरलं, मोठं झालं. छोट्या रोपट्याचा डेरेदार वृक्षात रूपांतर झालं, या डेरेदार वृक्षाच्या शीतल छायेत लाखो भूमिपुत्रांना त्यांच्या हक्काच्या नोकऱ्या मिळाल्या.

विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात झालेल्या अफाट क्रांतीमुळे मानवी जीवन अधिक गतिमान आणि आव्हानात्मक झाले आहे. जीवघेण्या स्पर्धेमुळे तरुणांमधील मानसिक ताण वाढत आहे, अशावेळी महासंघाने सातत्याने भूमिपुत्रांच्या शारीरिक, बौद्धिक, नैतिक व अध्यात्मिक क्षमतांचा विकास करण्यासाठी उपक्रम राबविले आहेत. महासंघाने भूमिपुत्रांना स्पर्धा परीक्षेला समर्थपणे सामोरे जाता यावे यासाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण वर्ग सुरु केले. हे उपक्रमच व्यक्तीच्या आणि पर्यायाने समाजाच्या समृद्धीचा पाया आहेत.

स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र,व्यक्तिमत्व विकास केंद्र, व्यवसाय मार्गदर्शन केंद्र हे महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ दरवर्षी २७ फेब्रुवारी ला ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित मराठीतील जेष्ठ कवी श्री. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त "मराठी भाषा दिवस" म्हणून साजरा करीत असते. मराठी भाषा दिवस म्हणजे महाराष्ट्राचे वैचारिक व्यासपीठ. हा दिवस म्हणजे मायमराठीचा गजर करीत समाज प्रबोधन करणारे एक छोटेखानी साहित्य संमेलनच!

यंदा ५० व्या वर्षी महासंघ ३० एप्रिल, २०२३ रोजी महा शिबीर घेणार आहे. महा शिबीराच्या निमित्ताने "शिवसेनाप्रमुख स्मृती-२०२३" या अंकाचे प्रकाशन केले जाणार आहे. या अंकाच्या माध्यमातून मिळणाऱ्या जाहिराती हा महासंघाच्या उपक्रमासाठी एक महत्वपूर्ण आर्थिक स्त्रोत आहे. "शिवसेनाप्रमुख स्मृती-२०२३" या अंकासाठी जाहिरात देऊन आपण आमच्या समाजकार्यात सहभागी व्हावे हे नम्र निवेदन.

धन्यवाद!

आपले विनीत,

| | | | |
|---|---|---|---|
| **खा.अनिल देसाई** | **आ.विलास पोतनीस** | **आ.सुनील शिंदे** | **प्रदीप मयेकर** |
| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष | सरचिटणीस |

**स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ**

0912

स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या '**शिवसेनाप्रमुख स्मृती-२०२३**' या अंकात आम्ही जाहिरात देऊ इच्छितो. त्याकरिता असणाऱ्या सर्व अटी आणि नियमांचे आम्ही पालन करू.

**जाहिरातीचा तपशील :**

जाहिरातीची साईज : ☐ चतुर्थ पान ☐ अर्ध पान ☐ पूर्ण पान

जाहिरातीचा प्रकार : ☐ बहुरंगी पूर्ण पान ☐ एकरंगी पूर्ण पान ☐ कृष्ण धवल

जाहिरातीचा मजकूर : ____________________

____________________

____________________

____________________

____________________

इतर सूचना : ____________________

____________________

जाहिरातीचा दर : ____________________

आम्ही रु. .................................................................. ची रोख / धनादेश सोबत पाठवीत आहोत.

बँकेचे नाव ....................................................... दि.................................... धनादेश क्र. ..............................

महासंघ संपर्क प्रतिनिधी :

____________________

अधिकृत व्यक्तीची स्वाक्षरी व संपर्क

धनादेश "**स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ**" या नावे काढावा.

# जाहिरातींचे दर

मुद्रण क्षेत्र आकार
२८ सेंमी x २१ सेंमी

| | |
|---|---|
| पूर्ण पान : | २६ सेंमी x १९ सेंमी |
| अर्ध पान : | १३ सेंमी x १९ सेंमी |
| चतुर्थांश पान : | १३ सेंमी x ९.५ सेंमी |

जाहिरातींचे दर
मागील पान : मागणीनुसार
कमीत कमी रु. २,००,००० /
आतील पुढील पान : मागणीनुसार
कमीत कमी रु. १,२५,००० /-
आतील मागील पान : मागणीनुसार
कमीत कमी रु. १,२५,००० /-

| | | | |
|---|---|---|---|
| बहुरंगी पूर्ण पान : | रु. १५,००० /- | एकरंगी पूर्ण पान : | रु. ८,००० /- |
| पूर्ण पान (कृष्णधवल) : | रु. ५,००० /- | अर्ध पान (कृष्णधवल) : | रु. ३,००० /- |
| चतुर्थांश पान (कृष्णधवल) : | रु. २,००० /- | | |

